२१) बाहेरील कर्ज उभारणेच्या मर्यादेपर्यंत तारणावर विनातारण कर्ज, कॅश क्रेडीट, ओव्हर ड्राफ्ट इत्यादी उभारणे व त्यावरील अटी व शर्ती मान्य करणे.

२२) कर्जे, कॅश क्रेडीटस्, बिल्स डिस्काऊटींग वगैरे अर्जाचा विचार करणे व त्याच्या अटी ठरविणे. कर्जे मंजूर करणे तसेच दिलेल्या विविध कर्जे व कॅश क्रेडीट योजनांचे नियमात व अटीत आवश्यकतेनुसार बदल करणे. नवीन अटी घालणे. जुन्या अटी रद्द करणे.

२३) व्यापारी, राष्ट्रीयकृत अगर सहकारी बँकेच्या तसेच आर्थिक संस्थांच्या सहभाग योजनेत सामील होणे व त्यासंबधी कर्जाच्या, अटीं, शर्तीचा विचार करणे.

२४) कोणत्याही प्रकरणात तंटा अगर वाद निर्माण झाल्यास बँकेचे बाजूने अगर विरुध्द असेल तरी मे.निबंधक, सहकारी खाते अगर सहकारी न्यायालयाकडे सदर प्रकरण दाखल करणे, सुपुर्त करणे.

२५) बँक संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचे बाजूने अगर विरुध्द होणाऱ्या कायदेशीर कारवाई प्रकरणात कारवाई करणे, त्यात तडजोड करणे, मागे घेणे, अगर निकाली काढणे.

२६) दलाल तज्ञ, सल्लागार, सिक्युरिटी कंपनी, कायदा सल्लागार व चौकशी अधिकारी अथवा याबाबत कामे करणारी संस्था यांना बँकेच्या व्यवहारासंबधी कराराने नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे. अंतर्गत हिशेब तपासनीस नेमणे, मेहनताना ठरविणे.

२७) बँकेसाठी जागा भाड्याने, खरेदी करणेसाठी करार करणे, त्यासाठी आगाऊ भाडे, ठेव व भरपाईची अथवा तारणासहीत विरहित दिर्घ उचलीची रक्कम ठरविणे.

२८) सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारणे,

२९) जरुरीप्रमाणे संचालक मंडळ खालीलप्रमाणे उपसमितीची नेमणूक करेल.

अ) पाच संचालकापेक्षा जास्त नसलेली उपसमिती/उपसमित्या नेमणे, त्यांना जरुर ते अधिकार देणे. या समितीत अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश असेल.

ब) बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या कामकाजावर अंतर्गत नियंत्रण राहणेसाठी व कार्यक्षमतेसाठी ५ संचालकापेक्षा जास्त नाही अशी संचालकांची एक अंतर्गत लेखापरिक्षण समिती नियुक्त केली जाईल.

३०) मुख्य कार्यकारी अधिकारी अगर अधिकाऱ्यांना ठराविक मर्यादेपर्यंत कर्ज व उचल मंजूर करण्याचे अधिकार देणे, तसेच कायदेशीर कारवाईमध्ये बँकेचेवतीने त्यात भाग घेण्याचे अधिकार देणे.